ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
टेलि. ५५६२७
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार, १८ डिसेंबर, १९६३ | अंक २२

## विविध माहिती

**हिंदी व्यापाऱ्यांवर संकट**—सिलोनच्या सरकारनें देशांत कापड आयात करण्याचे परवाने फक्त सिलोनच्या नागरिकांनाच देण्याचा विचार चालविला आहे. ह्या विचारास अनुसरून कृति करण्यांत आल्यास १७५ हिंदी व्यापाऱ्यांना कापडाच्या व्यापारांतून काढून टाकल्यासारखेंच होईल. व्यापारांत सिलोनी लोकांचाच समावेश करण्याचें सरकारचें धोरण आहे. सिलोन दरसाल सुमारें १५ कोटी रुपयांचें कापड परदेशांतून आयात करीत असतें.

**रासायनिक धंद्यावद्दल चर्चा**—रशिअन कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीची बैठक लवकरच भरणार आहे. ह्या बैठकींत रासायनिक उद्योगधंद्यांविषयीं खास चर्चा करण्यांत येणार आहे. खनिजांपासून तयार होणाऱ्या खतांचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीनें बैठक महत्त्वपूर्ण ठरण्याची शक्यता आहे. रशिआंतील शेतीच्या उत्पादनाच्या वाढीला रासायनिक खतांची अधिकाधिक गरज लागत आहे.

**हिंदी ग्रंथांचीं भाषांतरें**—भारतीय भाषांतील ४६० ग्रंथांचीं रशिआंत प्रचलित असणाऱ्या २८ भाषांतून भाषांतरें करण्यांत आलेलीं आहेत. ह्या ग्रंथांत रामायण–महाभारतासारखीं महाकाव्यें, टागोरांचे ग्रंथ, महात्मा गांधींच्या व पं. जवाहरलाल नेहरू ह्यांच्या ग्रंथांचा समावेश आहे. भाषांतरित ग्रंथांच्या सुमारें १·७ कोटी प्रती रशिआंत खपल्या आहेत.

**ध्रुव प्रदेशांत तेलाचा सांठा**—डोमिनियन एक्सप्लोअरर्स लि. नांवाच्या कॅनेडियन कंपनीतर्फें करण्यांत आलेल्या संशोधनांत असें आढळून आलें आहे कीं, ध्रुव प्रदेशांत खनिज तेलाचा फार मोठा सांठा उपलब्ध होईल. केवळ कॅनडाच्या हद्दींतील ध्रुव प्रदेशांतच १४ कोटी हेक्टोलिटर्स तेल सांपडू शकेल.

**सन्मान मिळालेला शिक्षक बडतर्फ**—काश्मीरचे मुख्य मंत्री श्री. शमसुद्दीन ह्यांनीं राज्यकारभाराची सुधारणा करण्यासाठी ९७ अधिकाऱ्यांना बडतर्फ केलें. ह्या लोकांत एक शिक्षकहि आहे. राज्यांतील उत्तम शिक्षक म्हणून त्याचा लौकिक होता आणि त्याचा राष्ट्रपतींनीं गौरवहि केलेला होता. ज्या अधिकाऱ्यांना कामावरून कमी करण्यांत आलें, त्यांची मागील वागणूक आणि नौकरीचा इतिहास लक्षांत घेण्यांत आला होता.

**देवदासींकडील इनाम जमिनी**—म्हैसूर राज्यांत देवदासींची पद्धत आतां अस्तित्वांत नाहीं. परंतु त्यांना पूर्वी देण्यांत आलेल्या इनाम जमिनी अद्याप त्यांच्याकडेच भोगवट्याला आहेत. बेळगांव व धारवाड जिल्ह्यांत सुमारें ३५० एकर जमीन देवदासींकडे आहे. राज्यघटनेप्रमाणे अशा इनाम जमिनी काढून घेण्यांत यावयाच्या आहेत.

**भारतानें आपला हप्ता दिला**—सिंधू नदीखोरें विकास-निधीसाठी स्थापन करण्यांत आलेल्या फंडाचा आपल्या वाट्याचा चौथा हप्ता भारतानें दिला आहे. ह्या हप्त्याची रक्कम ६० लाख पौंड अथवा ८·२७ कोटी रुपये होती. सिंधू नदीच्या पाण्याबाबत करण्यांत आलेल्या कराराप्रमाणें भारतानें १० वर्षांत ६·२० लाख पौंड रक्कम फंडासाठी द्यावयाची आहे. ह्या कालावधींत पाकिस्ताननें पाणीपुरवठ्याची पर्यायी व्यवस्था करावयाची आहे.

**कधीं असेंहि होतें**—कॅनडांतील मॉन्ट्रीलपासून टोरोंटोला जाणाऱ्या डी. सी. ८ ह्या विमानाला अपघात होऊन त्यांत ११८ उतारू मरण पावले. ह्या विमानानें जाऊं इच्छिणारे २५ प्रवासी विमानतळावर वेळेवर येऊं न शकल्यानें मागें राहिले. विमानतळावर जातांना रस्त्यावरील गर्दीमुळें त्यांना बरेंच थांबावें लागलें होतें. विमानतळ गांठल्यावर त्यांचा रागाचा पारा बराच चढलेला होता. परंतु लवकरच त्यांना विमानअपघाताची बातमी समजली.

**प्रे. केनेडी ह्यांचें पुस्तक**—अमेरिकेचे ख्रिस्तवासी प्रे. केनेडी ह्यांनीं लिहिलेल्या एका पुस्तकाचें प्रकाशन १९६४ च्या जूनमध्यें करण्याचें अमेरिकेंतील हार्प ॲन्ड ब्रदर्स ह्या प्रकाशकांनीं ठरविलें आहे. अमेरिकेंत परदेशांतून येऊन वसाहत केलेल्या लोकांच्यामुळें अमेरिकेच्या प्रगतीस कशी मदत झाली, ह्याची चर्चा प्रे. केनेडी ह्यांनीं आपल्या पुस्तकांत केली आहे. अमेरिकेंत अनेक युरोपीय व इतर देशांतील लोक कित्येक वर्षांपासून स्थायिक झाले आहेत.

**आयुर्वेदीय पुस्तकांचीं भाषांतरें**—तंजावर येथील ग्रंथ-संग्रहालयांत आयुर्वेदावर लिहिलेलीं कांहीं अमूल्य पुस्तकें आहेत. हीं पुस्तकें मल्ल्याळी, तामिळ आणि तेलगू लिपींत असल्यानें त्यांचा उपयोग मर्यादित झाला आहे. आयुर्वेदीय संशोधनाच्या मध्यवर्ती संस्थेनें ह्या पुस्तकांचे इतर भारतीय भाषांत भाषांतर करून ती प्रकाशित करण्याचें ठरविलें आहे.

**औषधी-कारखाने व बागा**—शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन मंडळानें जम्मू व काश्मीरमधील औषधी वनस्पतींचीं उद्यानें आणि औषधांचे कारखाने स्वतःकडे घेण्याचा विचार चालविला आहे. हे कारखाने व उद्यानें चालविण्याबाबत काश्मीरच्या सरकारला कांहीं अडचणी भासत आहेत. औषधासाठीं लागणारी कांहीं तेलें कारखान्यांतून तयार करण्यांत येत असतात.

**गव्हाचा आंतरराष्ट्रीय व्यापार**—कॅनडानें चीन, झेकोस्लोव्हाकिआ, बल्गेरिआ, पोलंड, ह्या देशांना गहूं पुरविण्याचे दीर्घ मुदतीचे करार केले आहेत. पूर्व युरोपांतील देशांना व रशिआला कॅनडाकडून गहूं देण्यांत येत असल्यामुळें गव्हाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारांत फरक पडण्याचा संभव आहे.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ पुणें, बुधवार, १८ डिसेंबर, १९६३ अंक २२

## विविध माहिती

**हिंदी व्यापाऱ्यांवर संकट**—सिलोनच्या सरकारनें देशांत कापड आयात करण्याचे परवाने फक्त सिलोनच्या नागरिकांनाच देण्याचा विचार चालविला आहे. ह्या विचारास अनुसरून कृति करण्यांत आल्यास १७५ हिंदी व्यापाऱ्यांना कापडाच्या व्यापारांतून काढून टाकल्यासारखेंच होईल. व्यापारांत सिलोनी लोकांचाच समावेश करण्याचें सरकारचें धोरण आहे. सिलोन दरसाल सुमारें १५ कोटी रुपयांचें कापड परदेशांतून आयात करीत असतें.

**रासायनिक धंद्यावद्दल चर्चा**—रशिअन कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीची बैठक लवकरच भरणार आहे. ह्या बैठकींत रासायनिक उद्योगधंद्यांविषयीं खास चर्चा करण्यांत येणार आहे. खनिजांपासून तयार होणाऱ्या खतांचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीनें बैठक महत्त्वपूर्ण ठरण्याची शक्यता आहे. रशिआंतील शेतीच्या उत्पादनाच्या वाढीला रासायनिक खतांची अधिकाधिक गरज लागत आहे.

**हिंदी ग्रंथांचीं भाषांतरें**—भारतीय भाषांतील ४६० ग्रंथांचीं रशिआंत प्रचलित असणाऱ्या २८ भाषांतून भाषांतरें करण्यांत आलेलीं आहेत. ह्या ग्रंथांत रामायण-महाभारतासारखीं महाकाव्यें, टागोरांचे ग्रंथ, महात्मा गांधींच्या व पं. जवाहरलाल नेहरू ह्यांच्या ग्रंथांचा समावेश आहे. भाषांतरित ग्रंथांच्या सुमारें १·७ कोटी प्रती रशिआंत खपल्या आहेत.

**ध्रुव प्रदेशांत तेलाचा सांठा**—डोमिनियन एक्सप्लोअरर्स लि. नांवाच्या कॅनेडियन कंपनीतर्फे करण्यांत आलेल्या संशोधनांत असें आढळून आलें आहे कीं, ध्रुव प्रदेशांत खनिज तेलाचा फार मोठा सांठा उपलब्ध होईल. केवळ कॅनडाच्या हद्दींतील ध्रुव प्रदेशांतच १४ कोटी हेक्टोलिटर्स तेल सांपडू शकेल.

**सन्मान मिळालेला शिक्षक बडतर्फ**—काश्मीरचे मुख्य मंत्री श्री. शमसुद्दीन ह्यांनीं राज्यकारभाराची सुधारणा करण्यासाठी ९७ अधिकाऱ्यांना बडतर्फ केलें. ह्या लोकांत एक शिक्षकहि आहे. राज्यांतील उत्तम शिक्षक म्हणून त्याचा लौकिक होता आणि त्याचा राष्ट्रपतींनीं गौरवहि केलेला होता. ज्या अधिकाऱ्यांना कामावरून कमी करण्यांत आलें, त्यांची मागील वागणूक आणि नौकरीचा इतिहास लक्षांत घेण्यांत आला होता.

**देवदासीकडील इनाम जमिनी**—म्हैसूर राज्यांत देवदासींची पद्धत आतां अस्तित्वांत नाहीं. परंतु त्यांना पूर्वी देण्यांत आलेल्या इनाम जमिनी अद्याप त्यांच्याकडेच भोगवट्याला आहेत. बेळगांव व धारवाड जिल्ह्यांत सुमारें ३५० एकर जमीन देवदासींकडे आहे. राज्यघटनेप्रमाणे अशा इनाम जमिनी काढून घेण्यांत यावयाच्या आहेत.

**भारतानें आपला हप्ता दिला**—सिंधू नदीखोरें विकास-निधीसाठीं स्थापन करण्यांत आलेल्या फंडाचा आपल्या वाट्याचा चौथा हप्ता भारतानें दिला आहे. ह्या हप्त्याची रक्कम ६० लाख पौंड अथवा ८·२७ कोटी रुपये होती. सिंधू नदीच्या पाण्याबाबत करण्यांत आलेल्या कराराप्रमाणें भारतानें १० वर्षांत ६·२० लाख पौंड रक्कम फंडासाठीं द्यावयाची आहे. ह्या कालावधींत पाकिस्ताननें पाणीपुरवठ्याची पर्यायी व्यवस्था करावयाची आहे.

**कधीं असेंहि होतें**—कॅनडांतील माँट्रीलपासून टोरोंटोला जाणाऱ्या डी. सी. ८ ह्या विमानाला अपघात होऊन त्यांत ११८ उतारू मरण पावले. ह्या विमानानें जाऊं इच्छिणारे २५ प्रवासी विमानतळावर वेळेवर येऊं न शकल्यानें मागें राहिले. विमानतळावर जातांना रस्त्यावरील गर्दीमुळें त्यांना बरेंच थांबावें लागलें होतें. विमानतळ गांठल्यावर त्यांचा रागाचा पारा बराच चढलेला होता. परंतु लवकरच त्यांना विमानअपघाताची बातमी समजली.

**प्रे. केनेडी ह्यांचें पुस्तक**—अमेरिकेचे ख्रिस्तवासी प्रे. केनेडी ह्यांनीं लिहिलेल्या एका पुस्तकाचें प्रकाशन १९६४ च्या जूनमध्यें करण्याचें अमेरिकेंतील हार्प अॅन्ड ब्रदर्स ह्या प्रकाशकांनीं ठरविलें आहे. अमेरिकेंत परदेशांतून येऊन वसाहत केलेल्या लोकांच्या मुळें अमेरिकेच्या प्रगतीस कशी मदत झाली, ह्याची चर्चा प्रे. केनेडी ह्यांनीं आपल्या पुस्तकांत केली आहे. अमेरिकेंत अनेक युरोपीय व इतर देशांतील लोक कित्येक वर्षांपासून स्थायिक झाले आहेत.

**आयुर्वेदीय पुस्तकांचीं भाषांतरें**—तंजावर येथील ग्रंथसंग्रहालयांत आयुर्वेदावर लिहिलेलीं कांहीं अमूल्य पुस्तकें आहेत. हीं पुस्तकें मल्याळी, तामिळ आणि तेलगू लिपींत असल्यानें त्यांचा उपयोग मर्यादित झाला आहे. आयुर्वेदीय संशोधनाच्या मध्यवर्ती संस्थेनें ह्या पुस्तकांचें इतर भारतीय भाषांत भाषांतर करून तीं प्रकाशित करण्याचें ठरविलें आहे.

**औषधी-कारखाने व बागा**—शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन मंडळानें जम्मू व काश्मीरमधील औषधी वनस्पतींचीं उद्यानें आणि औषधांचे कारखाने स्वतःकडे घेण्याचा विचार चालविला आहे. हे कारखाने व उद्यानें चालविण्याबाबत काश्मीरच्या सरकारला कांहीं अडचणी भासत आहेत. औषधासाठीं लागणारी कांहीं तेलें कारखान्यांतून तयार करण्यांत येत असतात.

**गव्हाचा आंतरराष्ट्रीय व्यापार**—कॅनडानें चीन, झेकोस्लोव्हाकिआ, बल्गेरिआ, पोलंड, ह्या देशांना गहूं पुरविण्याचे दीर्घ मुदतीचे करार केले आहेत. पूर्व युरोपांतील देशांना व रशिआला कॅनडाकडून गहूं देण्यांत येत असल्यामुळें गव्हाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारांत फरक पडण्याचा संभव आहे.

### जीवनसत्त्वांचा अतिरेकहि हानिकारकच

मनुष्याच्या आहारांत जीवनसत्त्वांना असणारें महत्त्व सर्व-परिचितच आहे. अमुक एका जीवनसत्त्वाच्या अभावीं अमुक प्रकारचा दोष शरीरांत उत्पन्न होतो, अशा प्रकारची माहिती देणारे लेख बहुतेकांच्या वाचनांत आलेले असतात. परंतु आहार-विषयक माहिती देणाऱ्या लेखांचा दुरुपयोगहि बरेचजण करीत असतात. जर्मनींत तर जीवनसत्त्वयुक्त पदार्थांचें व कृत्रिम जीवन-सत्त्वांचें भक्षण करण्याचा अतिरेक होऊं लागला आहे. जर्मनीमधील कित्येक लोक नैसर्गिक पदार्थांच्या सेवनाच्याहि पुढें जाऊन कृत्रिमरीत्या तयार केलेल्या जीवनसत्त्वयुक्त गोळ्यांचेंहि प्रमाणाबाहेर सेवन करूं लागले आहेत. कृत्रिम जीवनसत्त्वयुक्त गोळ्यांचा वापर प्रमाणाबाहेर होऊं लागल्यामुळें एक प्रकारची गुंगीच घेणाऱ्याला येते, असा संशय येऊं लागला आहे. जर्मनी-मधील एका प्रसिद्ध आहारसंशोधकानें असा इशारा दिला आहे कीं, नैसर्गिक पदार्थांमधून मिळणाऱ्या जीवनसत्त्वांची जागा कृत्रिम जीवनसत्त्वें कधींहि घेऊं शकणार नाहींत. त्याचप्रमाणें जर्मनीमधील कांहीं शास्त्रज्ञांनींहि जीवनसत्त्वांच्या अतिरिक्त वापराबद्दल धोक्याच्या सूचना दिल्या आहेत. ह्या सूचना मुख्यत: 'अ' व 'ड' जीवनसत्त्वांबद्दल देण्यांत आल्या आहेत. अगदीं लहान मुलांना व चार-पांच वर्षांच्या मुलांना हीं जीवनसत्त्वें योग्य प्रमाणांत देणें अगत्याचें असतें. पण पुष्कळ जर्मन माता डॉक्टरच्या सल्ल्याला न जुमानतां कॉड लिव्हर तेल व 'अ' जीवनसत्त्वाच्या गोळ्या प्रमाणाबाहेर देतात. त्यामुळें कांहीं मुलांना अतिशय कंड सुटते तर कांहींना टकलच पडतें; कांहीं मुलांना चालण्यास व पळण्यास फार कष्ट पडतात, असें आढळून आलें आहे. गर्भवती स्त्रियांनीं 'थॅलिडोमाइड'च्या गोळ्या घेतल्यामुळें जर्मनींत नुकतीच आपत्ति ओढवली होती.

---

### बँक मॅनेजर लवकर मरतात, ही कल्पना खोटी

बँकांचे मॅनेजर दिर्घायुषी नसतात; सेवानिवृत्तीची विश्रांति त्यांना फारशी लाभत नाहीं, असा एक समज आहे. जुलै, १९६२ ते जून, १९६३ ह्या मुदतींतील मृत्यूंच्या आकडेवारीनें त्या समजाला दुजोरा मिळत नाहीं; इतरांच्यापेक्षा बँक मॅनेजर लवकर मृत्यु पावतात हें खोटें ठरलें आहे. बार्कलेज बँकेचे १९० सेवानिवृत्त अधिकारी आणि लॉइड्स बँकेचे २३० सेवानिवृत्त अधिकारी ह्या १२ महिन्यांत मरण पावले. त्यांचें मृत्युसमयीं वय अनुक्रमें ७५.६ वर्षे आणि ७३.६ वर्षे होतें. बार्कलेज, लॉइड्स आणि मिडलंड बँकांत मिळून ६४८ मृत्यु झाले. त्यांतील १०४ जण कामावर असतांनाच वारले. बाकीच्यांपैकी ३५७ म्हणजे एकूणच्या ५४% मृत्युसमयीं ७० वर्षांपेक्षा मोठे होते. सेवानिवृत्तीच्या वयानंतर जगलेले ६५% लोक ७० वर्षांपर्यंत जगले, २५% लोकांनीं ८० वर्षांची मर्यादा गांठली आणि १७ जण ९० वर्षांपुढेंहि गेले. कांहीं सेवानिवृत्त अधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर ३० वर्षे जगले.

### " विवाह करतांना पक्षनिष्ठ राहा "

"जाळ्यांत पकडणाऱ्या सुंदर तरुणीपासून सावध राहा; स्वत:च्या राजकीय ध्येयवादाच्या तरुणींशींच विवाह करा" असा सल्ला पीकिंगमधील एका वृत्तपत्रानें चिनी तरुणांना दिला आहे.

---

### किर्लोस्कर ब्रदर्स, लि.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.नें ३१ जुलै, १९६३ अखेर संपलेल्या वर्षी ४.८३ कोटी रुपयांची विक्री करून ५९.६५ लक्ष रुपये ठोक नफा मिळविला.


रु. १००-०० तुम्हीं आज गुंतवले, तर
तीन वर्षांअखेर त्याचे
रु. ११३-५० तुम्हांला मिळतील
**दि बेळगांव बँक कॅश सर्टिफिकेटांत पैसे गुंतवा**
आणि
द. सा. ४¼% व्याज ठेव परत घेतांना मिळवा.
( जरूर पडली, तर मुदतीपूर्वी तुम्हीं रक्कम परत घेऊं शकता; तुमच्या ठेवीची संपूर्ण रक्कम मिळून वर कांहीं व्याजहि पण मिळेल. )
[ सर्टिफिकिटें वेगवेगळ्या रकमेचीं दिलीं जातात. ]
आमच्या कोणत्याहि कचेरींत चौकशी करा
**दि बेळगांव बँक लिमिटेड**
स्थापना—१९३० ] [ शेड्यूल्ड बँक
— रजिस्टर्ड ऑफिस —
रविवार पेठ, बेळगांव.
म्हैसूर आणि महाराष्ट्र राज्यांत शाखा विस्तार



**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा**
शेड्यूल्ड बँक
हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.
टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:-युवर बँक
—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—
चालू :-०.५० टके. सेव्हिंग्ज् बँक :-३ टके
मुदत ठेवी
१ वर्ष-४½ टके, २ वर्षे-४¾ टके, ३ वर्षे-४¾ टके,
४ वर्षे-५ टके, ५ वर्षे-५¼ टके.
एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.
शाखा-विस्तार
शाखा-१. मुंबई-फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर-मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | दि. ३१-१२-१९६२ |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९,६०,८२५ |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ३,४३,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,००,००,०००हून अधिक |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.
रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम्., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.

# अर्थ

बुधवार, १८ डिसेंबर, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## नॅशनल अँड ग्रिंडलेज बँकेचीं शंभर वर्षे

### आशिया-आफ्रिकेंतील बँकिंगची पूर्वपीठिका

नॅशनल अँड ग्रिंडलेज बँकेला चालू वर्षी १०० वर्षे पुरीं झालीं आहेत. १८६३ सालीं कलकत्ता येथें तिघे इंग्रज आणि चौघे हिंदी अशा सातजणांनीं कलकत्ता सिटी बँकिंग कॉर्पोरेशनची स्थापना केली. तो सट्टेबाजीच्या चलतीचा काळ होता आणि बँकेचा कर्जावरील व्याजाचा दर सरकारी रोख्यांच्या तारणावरहि १४% होता. ह्यापूर्वीच्या काळीं कलकत्ता, मुंबई व मद्रास येथील युरोपियन फर्म्स बँकिंग आणि व्यापार, दोन्ही धंदे करीत असत. व्यापारांतील चढ-उतारामुळें ठेवी बुडण्याची पाळी येई. म्हणून बँकिंग व व्यापार अलग करण्याचें महत्त्व पटून तीन शहरांत प्रेसिडेन्सी बँका स्थापन करण्यांत आल्या. हिंदी मालाला युरोपांत खूप मागणी होती.अमेरिकेंतील अंतर्गत युद्धामुळें अमेरिकन कपास लँकेशायरच्या गिरण्यांना मिळेनाशी झाली आणि हिंदी कपाशीला भयंकर मागणी आली; चलतीनें व्यापाऱ्यांचे डोळे फाटले. त्यानें निर्माण झालेल्या परिस्थितींत बँक ऑफ बाँबे आणि इतर ११ बँका बंद पडण्याची पाळी आली. १८६९ मध्यें सुएझ कालवा सुरू झाल्यामुळें, लँकेशायरची बाजारपेठ ४,००० मैलांनीं जवळ आली. त्यानंतर विद्युत् संदेशासाठी केबल्स टाकण्यांत आल्या. युरोपांतील बाजाराच्या परिस्थितीचें अज्ञान असतांनाच येथून माल पाठविण्याची आतां आवश्यकता उरली नाहीं. व्यापार वाढत चालला तसें बँकिंग, विमा, शिपिंग, ह्यांचे व्यवहारहि वाढूं लागले. कापडाच्या गिरण्या मुंबई, अहमदाबाद, नागपूर, मद्रास आणि कानपूर येथें सुरू झाल्या; कलकत्त्याजवळ तागाच्या गिरण्या स्थापन झाल्या.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत हिंदुस्थानांत वेगवेगळे ८० रुपये चालू होते. १८६३ मध्यें ब्रिटिश हद्दींतील रुपया एकाच किंमतीचा करण्यांत आला. कागदी चलनाला नुकताच प्रारंभ करण्यात आला. सर्वांत लहान नोट १० रुपयांची होती. त्या वेळीं रुपयाची किंमत मोठी होती, हें लक्षांत आणिलें म्हणजे किमान किमतीच्या नोटेचें भारी मूल्य पटेल. हुंड्या काढणें व डिस्कौंट करणें, हाच बँकिंगचा मुख्य व्यवहार होता.

कलकत्ता सिटी बँकिंग कॉर्पोरेशनची स्थापना झाली, तेव्हां तिचें वसूल भांडवल ५० लक्ष रु. होतें. पुढें कॉर्पोरेशनचें नांव बदलून तें नॅशनल बँक ऑफ इंडिया करण्यांत आलें, मुख्य कचेरीचें लंडनला स्थलांतर करण्यांत आलें आणि त्यामुळें विकासाला भरपूर संधि मिळाली. प्रारंभीच्या काळीं चढ-उतार आणि नंतर कांहीं विलिनी-करणें ह्यांतून आजची नॅशनल अँड ग्रिंडलेज बँक दिसत आहे. ग्रेट ब्रिटन, आशिया आणि आफ्रिका ह्यांत तिचें जाळें पसरलें आहे. आतां तिचें वसूल भांडवल सुमारें ९ कोटी रु. झालें आहे. पूर्वी एक कचेरी होती; आतां शाखांचें जाळें हिंदी महासागराच्या दुतर्फा पसरलें आहे. बँकेची जिंदगी ४५० कोटी रुपयांवर गेली आहे. १९४८ सालीं ग्रिंडलेज व नॅशनल ह्यांचें एकत्रीकरण झालें; १९६१ सालीं लॉइड्स बँकेचा पूर्व आशियांतील बँकिंग व्यवहार नॅशनलकडे आला, ह्या घटना ताज्या आहेत.

बँकेनें १०० वर्षांपूर्वी स्थानिक मॅनेजरांसाठी घालून दिलेले नियम अजूनहि मार्गदर्शक ठरत आहेत. त्यांची संख्या किंवा तपशील बदलला तरी बँकिंगचीं तत्त्वें कायमच आहेत. ज्या देशांतून बँकेचे व्यवहार चालू आहेत, ते सर्वच देश राजकीयदृष्ट्या स्थिर नाहींत. प्रत्येकांतील आर्थिक परिस्थितीहि भिन्न आहे. तरीसुद्धां, नॅशनलनें प्रत्येक ठिकाणीं आपलें बस्तान उत्तम बसविलेलें आहे. कित्येक देश आतां स्वतंत्र झाले आहेत; कांहीं वर्षांत आणखीहि होतील. परंतु ह्या सर्वांला यशस्वी रीतीनें तोंड देण्यास ही बँक समर्थ आहे; तिच्या संस्था-पकांनीं घालून दिलेली परंपरा हेंच त्याचें करण आहे. "निशाणाच्या पाठोपाठ व्यापार सुरू होतो, हें नेहमींच खरें नसतें; पूर्णपणें खरें नसतें. परंतु, निशाण सन्मानपूर्वक खालीं घेतल्यानंतरहि व्यापार दीर्घ काळ चालूं राहतो; वाढतोहि; हें सिद्ध करण्यास पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील" असें जिऑफ्रे टायसननें म्हटलें आहे.

हंड्रेड यिअर्स ऑफ बँकिंग इन एशिया अँड आफ्रिका—नॅशनल अँड ग्रिंडलेजचा शतसांवत्सरिक उत्सव. ग्रंथ-लेखक : जिऑफ्रे टायसन

## रूरकेला पोलाद कारखान्याचा विस्तार

रूरकेला येथील पोलाद कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. राजा ह्यांनीं कारखान्याच्या विस्तारासाठी अधिक पैशाची गरज असल्याचें सांगितलें आहे. परदेशी पत्रकारांच्या एका गटापुढें त्यांनीं कारखान्याची माहिती दिली. ते म्हणाले कीं, रूरकेला कारखान्याचा विस्तार करण्यासाठी पैशाची आगाऊ तरतूद करण्यांत आली पाहिजे. कारखान्याची अंतिम उत्पादनक्षमता २५ लाख टनांची ठरविण्यांत आलेली आहे. विस्ताराच्या योज-नेचा आराखडा तयार करण्याचें काम सध्यां चालू आहे. रूरकेला येथील कारखाना आर्थिकदृष्ट्या बळकट पायावर उभा राहण्या-साठीं त्याचें उत्पादन वाढत जाणें अगत्याचें आहे. सध्यां कार-खान्याची उत्पादनक्षमता १० लाख टनांची आहे. इतकें उत्पादन होऊं लागल्यावर दर टनाचा उत्पादनाचा खर्च रु. २,३४० इतका होतो. कारखान्याचें प्रत्यक्ष उत्पादन १८ लाख टनांपर्यंत पोंचलें म्हणजे दर टनाचा उत्पादनाचा खर्च २,००० रुपये होईल. २५ लाख टन उत्पादन होऊं लागल्यावर दर टनामागें उत्पादनाचा खर्च अधिकच कमी होईल. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत कारखान्याची परिस्थिति सुधारलेली आहे. गेल्या वर्षी कारखान्याला १०·७ कोटी रुपये तोटा आला. घसारा आणि व्याजाची तरतूद करून काढलेला हा तोट्याचा आकडा आहे. ऑक्टोबर ते मार्च ह्या सहा महिन्यांच्या कालांत परिस्थितींत सुधारणा होण्याची शक्यता आहे.

# अर्थ

बुधवार, १८ डिसेंबर, १९६३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## नॅशनल अँड ग्रिंडलेज बँकेचीं शंभर वर्षे

### आशिया-आफ्रिकेतील बँकिंगची पूर्वपीठिका

नॅशनल अँड ग्रिंडलेज बँकेला चालू वर्षी १०० वर्षे पुरीं झालीं आहेत. १८६३ सालीं कलकत्ता येथें तिघे इंग्रज आणि चौघे हिंदी अशा सातजणांनीं कलकत्ता सिटी बँकिंग कॉर्पोरेशनची स्थापना केली. तो सट्टेबाजीच्या चलतीचा काळ होता आणि बँकेचा कर्जावरील व्याजाचा दर सरकारी रोख्यांच्या तारणावरहि १४% होता. ह्यापूर्वीच्या काळीं कलकत्ता, मुंबई व मद्रास येथील युरोपियन फर्म्स बँकिंग आणि व्यापार, दोन्ही धंदे करीत असत. व्यापारांतील चढ-उतारामुळें ठेवी बुडण्याची पाळी येई. म्हणून बँकिंग व व्यापार अलग करण्याचें महत्त्व पटून तीन शहरांत प्रेसिडेन्सी बँका स्थापन करण्यांत आल्या. हिंदी मालाला युरोपांत खूप मागणी होती.अमेरिकेंतील अंतर्गत युद्धामुळें अमेरिकन कपास लँकेशायरच्या गिरण्यांना मिळेनाशी झाली आणि हिंदी कपाशीला भयंकर मागणी आली; चलतीनें व्यापाऱ्यांचे डोळे फाटले. त्यानें निर्माण झालेल्या परिस्थितींत बँक ऑफ बॉबे आणि इतर ११ बँका बंद पडण्याची पाळी आली. १८६९ मध्यें सुएझ कालवा सुरू झाल्यामुळें, लँकेशायरची बाजारपेठ ४,००० मैलांनीं जवळ आली. त्यानंतर विद्युत् संदेशासाठी केबल्स टाकण्यांत आल्या. युरोपांतील बाजाराच्या परिस्थितीचें अज्ञान असतांनाच येथून माल पाठविण्याची आतां आवश्यकता उरली नाहीं. व्यापार वाढत चालला तसें बँकिंग, विमा, शिपिंग, ह्यांचे व्यवहारहि वाढूं लागले. कापडाच्या गिरण्या मुंबई, अहमदाबाद, नागपूर, मद्रास आणि कानपूर येथें सुरू झाल्या; कलकत्त्याजवळ तागाच्या गिरण्या स्थापन झाल्या.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात हिंदुस्थानांत वेगवेगळे ८० रुपये चालू होते. १८६३ मध्यें ब्रिटिश हद्दींतील रुपया एकाच किंमतीचा करण्यांत आला. कागदी चलनाला नुकताच प्रारंभ करण्यात आला. सर्वांत लहान नोट १० रुपयांची होती. त्या वेळीं रुपयाची किंमत मोठी होती, हें लक्षांत आणिलें म्हणजे किमान किमतीच्या नोटेचें भारी मूल्य पटेल. हुंड्या काढणें व डिस्कौंट करणें, हाच बँकिंगचा मुख्य व्यवहार होता.

कलकत्ता सिटी बँकिंग कॉर्पोरेशनची स्थापना झाली, तेव्हां तिचें वसूल भांडवल ५० लक्ष रु. होतें. पुढें कॉर्पोरेशनचें नांव बदलून तें नॅशनल बँक ऑफ इंडिया करण्यांत आलें, मुख्य कचेरीचें लंडनला स्थलांतर करण्यांत आलें आणि त्यामुळें विकासाला भरपूर संधि मिळाली. प्रारंभींच्या काळीं चढ-उतार आणि नंतर कांहीं विलिनीकरणें ह्यांतून आजची नॅशनल अँड ग्रिंडलेज बँक दिसत आहे. ग्रेट ब्रिटन, आशिया आणि आफ्रिका ह्यांत तिचें जाळें पसरलें आहे. आतां तिचें वसूल भांडवल सुमारें ९ कोटी रु. झालें आहे. पूर्वी एक कचेरी होती; आतां शाखांचें जाळें हिंदी महासागराच्या दुतर्फा पसरलें आहे. बँकेची जिंदगी ४५० कोटी रुपयांवर गेली आहे. १९४८ सालीं ग्रिंडलेज व नॅशनल ह्यांचें एकत्रीकरण झालें; १९६१ सालीं लॉइड्स बँकेचा पूर्व आशियांतील बँकिंग व्यवहार नॅशनलकडे आला, ह्या घटना ताज्या आहेत.

बँकेनें १०० वर्षांपूर्वी स्थानिक मॅनेजरांसाठी घालून दिलेले नियम अजूनहि मार्गदर्शक ठरत आहेत. त्यांची संख्या किंवा तपशील बदलला तरी बँकिंगचीं तत्त्वें कायमच आहेत. ज्या देशांतून बँकेचे व्यवहार चालू आहेत, ते सर्वच देश राजकीयदृष्ट्या स्थिर नाहींत. प्रत्येकांतील आर्थिक परिस्थितीहि भिन्न आहे. तरीसुद्धां, नॅशनलनें प्रत्येक ठिकाणीं आपलें बस्तान उत्तम बसविलेलें आहे. कित्येक देश आतां स्वतंत्र झाले आहेत; कांहीं वर्षांत आणखीहि होतील. परंतु ह्या सर्वांला यशस्वी रीतीनें तोंड देण्यास ही बँक समर्थ आहे; तिच्या संस्थापकांनीं घालून दिलेली परंपरा हेंच त्याचें कारण आहे. "निशाणाच्या पाठोपाठ व्यापार सुरू होतो, हें नेहमींच खरें नसतें; पूर्णपणें खरें नसतें. परंतु, निशाण सन्मानपूर्वक खालीं घेतल्यानंतरहि व्यापार दीर्घ काळ चालू राहतो; वाढतोहि; हें सिद्ध करण्यास पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील" असें जिऑफ्रे टायसननें म्हटलें आहे.

हंड्रेड यिअर्स ऑफ बँकिंग इन एशिया अँड आफ्रिका—नॅशनल अँड ग्रिंडलेजचा शतसांवत्सरिक उत्सव- ग्रंथ-लेखक : जिऑफ्रे टायसन

## रूरकेला पोलाद कारखान्याचा विस्तार

रूरकेला येथील पोलाद कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. राजा ह्यांनीं कारखान्याच्या विस्तारासाठी अधिक पैशाची गरज असल्याचें सांगितलें आहे. परदेशी पत्रकारांच्या एका गटापुढें त्यांनीं कारखान्याची माहिती दिली. ते म्हणाले कीं, रूरकेला कारखान्याचा विस्तार करण्यासाठी पैशाची आगाऊ तरतूद करण्यांत आली पाहिजे. कारखान्याची अंतिम उत्पादनक्षमता २५ लाख टनांची ठरविण्यांत आलेली आहे. विस्ताराच्या योजनेचा आराखडा तयार करण्याचें काम सध्यां चालू आहे. रूरकेला येथील कारखाना आर्थिकदृष्ट्या बळकट पायावर उभा राहण्यासाठी त्याचें उत्पादन वाढत जाणें अगत्याचें आहे. सध्यां कारखान्याची उत्पादनक्षमता १० लाख टनांची आहे. इतकें उत्पादन होऊं लागल्यावर दर टनाचा उत्पादनाचा खर्च रु. २,३४० इतका होतो. कारखान्याचें प्रत्यक्ष उत्पादन १८ लाख टनांपर्यंत पोंचलें म्हणजे दर टनाचा उत्पादनाचा खर्च २,००० रुपये होईल. २५ लाख टन उत्पादन होऊं लागल्यावर दर टनामागें उत्पादनाचा खर्च अधिकच कमी होईल. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत कारखान्याची परिस्थिति सुधारलेली आहे. गेल्या वर्षी कारखान्याला १०·७ कोटी रुपये तोटा आला. घसारा आणि व्याजाची तरतूद करून काढलेला हा तोट्याचा आकडा आहे. ऑक्टोबर ते मार्च ह्या सहा महिन्यांच्या काळांत परिस्थितींत सुधारणा होण्याची शक्यता आहे.

## नर्मदा नदी खोरें योजनेचें महत्त्व

पुढील वर्षाच्या प्रारंभीं नर्मदा नदीखोरे योजनेच्या कामाला सुरुवात करण्यांत येणार आहे. नर्मदा नदीवर चुनासा ह्या ठिकाणीं एक आणि बार्गी आणि होशंगाबाद येथें प्रत्येकीं एक अशीं तीन धरणें बांधण्यांत येणार असून त्यांच्यामुळें मध्यप्रदेशाच्या आर्थिक विकासाला चांगली गति मिळणार आहे. नर्मदा ही नदी भारतामधील पवित्र नद्यांपैकीं एक असून तिच्या नांवाचें एक पुराणच रचण्यांत आलेलें आहे. तथापि आधुनिक जगाच्या दृष्टीनें वीज उत्पन्न करण्यास अत्यंत उपयुक्त अशी ही नदी असल्यानें ती ज्या भूभागांतून वहाते त्याची आर्थिक भरभराट करून घेतां येणें शक्य होणार आहे. नर्मदा नदीच्या जलप्रवाहाचा फायदा घेऊन २,००० मेगॅवॅट वीज निर्माण करतां येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. त्याशिवाय शेतीला पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीनें आणि जलवाहतूक सुलभ करण्याच्या दृष्टीनेंहि ह्या योजनेला महत्त्व आहे. भडोच पासून होशंगाबाद–जबलपूर पर्यंत जलवहातूक करण्याच्या दृष्टीनें योजनेची आंखणी करण्यांत येण्याची शक्यता आहे, नर्मदा नदीवर बांधण्यांत यावयाच्या विविधउद्देशीय धरणांचा फायदा मुख्यत: मध्यप्रदेशाला मिळणार असला तरी गुजरात आणि महाराष्ट्र राज्याला विजेचा थोडाबहुत पुरवठा करतां येण्यासारखा आहे. गुजरात राज्यानें योजनेच्या अंमलबजावणींत सहकार्य देण्याचे आश्वासनहि दिलें आहे. नद्यांच्या पाण्याची वाटणी करण्याबद्दल अलीकडे राज्यांराज्यांत असणारे वाद कांहींसे विकोपास गेलेले आहेत. राज्यकारभाराच्या सोयीसाठी पाडण्यांत आलेले भाग नैसर्गिक, भौगोलिक परिस्थितींशीं जुळते असतातच असें नाहीं. म्हणून मोठ्या नद्यांच्या पाण्याच्या उपयोगाच्या योजना आंखतांना नैसर्गिक भूगोलाला प्राधान्य दिलें तरच त्यांच्या पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग करतां येईल.

## आर्थिक विकासासाठीं ब्रिटनकडून होणारी मदत

ब्रिटनच्या तांत्रिक सहकार्य खात्याचे चिटणीस मि. रॉबर्ट कार ह्यांनी अविकसित देशांना ब्रिटनकडून मिळत असलेल्या आर्थिक व तांत्रिक मदतीची माहिती सांगितली आहे. ह्यासंबंधींच्या पत्रकार परिषदेंत बोलतांना ते म्हणाले कीं, ब्रिटनच्या सार्वजनिक उत्पन्नांतून दरसाल १५ कोटी पौंड ब्रिटन आर्थिक मदतीसाठी खर्च करते. ही मदत रोखीनें देण्यांत येते. ह्या मदतीशिवाय जवळजवळ तितकीच भांडवल–गुंतवणूक खाजगी मालकीच्या विभागाकडून करण्यांत येते. भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी ब्रिटननें १२·५ कोटी पौंडांच्या मदतीची जिम्मेदारी घेतलेली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी ब्रिटननें ८ कोटी पौंडांची मदत दिलेली आहे. भारतासकट इतर मागासलेल्या देशांना देण्यांत येणाऱ्या ब्रिटनच्या मदतींत गेल्या पांच वर्षांत दुपटीनें वाढ झालेली आहे. ह्या मदतीपैकी ९० टक्के मदत कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील गरजू देशांना देण्यांत येते. प्रत्यक्ष आर्थिक मदतीशिवाय तांत्रिक तज्ज्ञांची मदतहि ब्रिटनकडून करण्यांत येत असते. आशिया आणि आफ्रिका खंडांतील निरनिराळ्या देशांतून सुमारें १५ ते २० हजार ब्रिटिश तंत्रज्ञ काम करीत आहेत. ह्या तंत्रज्ञांत शिक्षक, एंजिनिअर्स, डॉक्टर्स, रुग्णपरिचारिका, शेतीविषयक तज्ज्ञ, इत्यादि अनेक प्रकारचे लोक आहेत. खुद्द ब्रिटनमध्यें परदेशांतून आलेले ६५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ब्रिटनमध्यें उच्च शिक्षण घेत असलेल्या एकूण विद्यार्थ्यांत त्यांची टक्केवारी १० टक्के पडते. भारतामधून ब्रिटनमध्यें गेलेले ४ हजार हिंदी विद्यार्थी आहेत.

## जर्मन एंजिनियरांची साहसपूर्ण योजना

भूमध्य समुद्राच्या पोटांत असलेली २लक्ष २० हजार चौरस मैल जमीन युरोपला मिळवून देण्याची साहसी योजना जर्मन एंजिनिअरांनीं तयार केली आहे. ती अमलांत आणण्यांत आली तर इतकी मोठी शेतजमीन नव्यानें उपलब्ध होईल. कल्पना अशी आहे कीं, जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीला बांध घालून भूवेष्टित मोठ्या तळ्यासारख्या असलेल्या भूमध्य समुद्राच्या पाण्यावर नियंत्रण ठेवावयाचें व त्याची पातळी कमी करावयाची. कल्पना अमलांत आणली गेल्यास भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर नव्या जमिनीचा एक पट्टाच निर्माण होईल. जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीला बांध घालून समुद्रच अडविण्याची योजना साहसी आहे यांत शंकाच नाहीं; परंतु ह्या योजनेचा सर्व बाजूंनीं विचार करण्यांत आल्यावर तज्ज्ञांचें मत असें आहे कीं ती व्यवहार्य आहे. तथापि, योजनेमुळें कांहीं अडचणींचे प्रश्न उत्पन्न होणार आहेत. भूमध्य समुद्राच्या पाण्याची पातळी खालीं आणण्यांत आली तर त्याच्या कांठावर असणारीं मोठमोठीं बंदरें आणि विश्रांतिस्थानें निरुपयोगी होणार हें उघडच आहे. अर्थात् त्याचा परिणाम भूमध्य समुद्राभोंवतीं असलेल्या देशांच्या आर्थिक परिस्थितीवर झाल्याशिवाय राहणार नाहीं. तरीसुद्धां योजना पूर्ण करण्यांत आल्यास तीपासून मिळणारे फायदे एकंदरीनें अधिक असतील असा दावा करण्यांत येत आहे. योजनेच्या पुरस्कर्त्यांनीं तिचा आर्थिक आणि एंजिनिअरिंगच्या दृष्टीनें विचार केलेला आहे.शेतीसाठीं अधिक जमीन उपलब्ध करून देऊन शिवाय हवामानावर ह्या योजनेचा चांगला परिणाम होईल असें त्यांचें म्हणणें आहे. असल्या प्रकारच्या योजनांचा संबंध अनेक देशांशीं येतो. तेव्हा त्यांचा विचार घेतल्याशिवाय ही साहसी योजना प्रत्यक्षांत आणतां येणें कठीणच आहे.

## जपानच्या भरभराटीचा अनुकरणीय दाखला

म्हैसूर विद्यापीठाच्या पदवीदानप्रसंगीं भाषण करतांना रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर श्री. अय्यंगार ह्यांनीं मोलाचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले, कीं भारतांत दारिद्र्य फार आहे. तें नाहींसें करावयाचें असेल तर जपानच्या कार्यपद्धतीचा आश्रय करावा लागणार आहे. जपान हा देश आशियांतील उद्योगप्रधान देशांत तर अग्रेसर आहेच; पण तो तेथेंच थांबलेला नाहीं. आज जपान हा जगांतील मोठमोठ्या उद्योगप्रधान देशांतील एक प्रधान देश बनलेला आहे. हिंदमधील लोकांत उत्साह दिसून येत नाहीं. औद्योगीकरणाच्या दौडींत लोक धडाक्यानें भाग घेत नाहींत. ह्या बाबतींत जपानमधील लोक इतर अनेक देशांतील लोकांच्या पुढें आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीनें आपली आर्थिक घडी नीट बसवून भरभराट साधून घेतली हें खरें; पण ह्या बाबतींत खरा चमत्कार जपाननेंच करून दाखविलेला आहे. लोकांच्यापासून सरकार ही कांहीं निराळी गोष्ट आहे आणि कोणत्याहि दुर्दैवी घटनेबद्दल सरकारवर टीका केली कीं झालें असें मानण्याची वृत्ति भारतांत ब्रिटिश लोकांचें राज्य होतें तोंवर ठीक होती. पण अशा वृत्तीचे परिणाम चांगले होणार नाहींत. कारण, त्यामुळें राष्ट्रीय विकासावर वाईट परिणाम होतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतांत अनेक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संधि उत्पन्न झाल्या आहेत. परंतु त्याचबरोबर लोकसंख्येची वाढ आणि आर्थिक विकासाचा वेग ह्यांच्यांतील प्रमाण व्यस्त झालें आहे व होत आहे. तुटीच्या अर्थसंकल्पाचें तंत्र आतां पूर्णपणें वापरण्यांत आलेलें आहे. पण हें तंत्र निष्काळजीपणें वापरण्यांत आल्यास धोक्याचें ठरण्याची भीति असते. कारण त्यामुळें चलनवाढीचे प्रश्न उफाळून येतात.

## हिंदी गिरण्यांतील कपाशीचा खप

### विदेशी कपाशीचें प्रमाण १७·१३%

३१ ऑगस्ट, १९६३ अखेर संपलेल्या कपाशीच्या मोसमांत व्यापारी पीक ५७·६५ लक्ष गासड्या इतकें आलें. त्यांतील महाराष्ट्र-मध्यप्रदेश ह्यांचा वाटा १९·६३ लक्ष गासड्या होता. त्याखालोखाल गुजरातचा अनुक्रम लागला. (१८·७१ लक्ष गासड्या). गिरण्यांतून एकूण ५६·३२ लक्ष गासड्या खपल्या. विदेशी कपाशीची आयात ८·२० लक्ष गासड्या एवढी झाली. गिरण्यांतील विदेशी कपाशीचा उठाव ९·६५ लक्ष गासड्या एवढा झाला. गिरण्यांतील कपाशीच्या एकूण खपांतील विदेशी कपाशीचें प्रमाण १७·१३% पडलें. विदेशी कपाशीच्या आयातीपैकी ४८·६७% कपास ( ३,९९,०७९ गासड्या ) अमेरिकन होती. सुदानमधून १,६०,२४५ गासड्या आल्या; इजिप्तमधून १,२८,०८५ गासड्या आल्या. पूर्वआफ्रिकेंतून आणि पाकिस्तानांतून होणारी आयात बरीच रोडावली.

१९६२-६३ मध्यें ३,३०,६३३ गासड्यांची निर्यात झाली. जपान हा आपल्या कपाशीचा प्रमुख खरेदीदार आहे; त्यानें २,७२,५८७ गासड्या कपास घेतली. ग्रेट ब्रिटनकडे ४,६७६ गासड्या गेल्या. हाँगकाँगकडे होणारी निर्गत रोडावली आहे.

---

### अरबी दडपणामुळें ब्रिटिश कंपनीच्या ज्यू डायरेक्टरावर राजीनाम्याची पाळी

नॉर्विच युनियन ह्या बड्या विमा कंपनीच्या एका डायरेक्टराला अरब देशांच्या दडपणामुळें आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला आहे. लॉर्ड मॅनक्रॉफ्ट हा तो डायरेक्टर होय. तो ज्यू असून अरबांना तो नको आहे. बोर्डानें राजीनामा मंजूर केला आहे. परदेशांच्या दडपणामुळें हें सर्व घडलें आहे, हें बोर्ड मान्य करीत नाहीं. इस्राएलशीं अरबांचें अजून, तांत्रिकदृष्ट्या, युद्ध चालूं आहे; तेव्हां त्यांनीं स्वरक्षणासाठीं ज्यू लोकांना विरोध करणें स्वाभाविक आहे, असें अरबांचें समर्थन आहे. ज्या कंपन्यांच्या बोर्डावर ज्यू डायरेक्टर आहेत, अशांवर बहिष्कार घालण्याचा अरबी देशांचा निर्धार आहे; त्याला अनुसरूनच नॉर्विच युनियनला आपला ज्यू डायरेक्टर कमी करण्याविषयीं सुचविण्यांत आलें.

ग्रेट ब्रिटनचा अरब देशांशीं व्यापार चालतो, त्याची किंमत गेल्या वर्षी ५० कोटी पौंड भरली; इस्राएलशी होणारा वार्षिक व्यापार ४ कोटी पौंडांचाहि नाहीं. ग्रेट ब्रिटनला तेलाचा पुरवठा मुख्यतः अरबी देशांतूनच होता; दळणवळणाच्या दृष्टीनेंहि हा विभाग ग्रेट ब्रिटनला महत्त्वाचा आहे. सहाजिकच, नॉर्विच युनियनला अरबी धाकापुढें नमावें लागलें आहे.

'अरब लीग ब्युरो फॉर दि बॉयकॉट ऑफ एस्राएल'नें ५० ब्रिटिश कंपन्या 'बहिष्कृत' ठरविल्या आहेत; त्या कंपन्यांना अरबी देशांत व्यवहार करतां येणार नाहीं. अरबी देशांनीं इस्राएलशीं बहिष्कार पुकारला आहे, त्याच्याशीं व्यत्यय आणणाऱ्या सर्व कंपन्यांवर अशीच पाळी येणार आहे.

---

### कापडधंद्याच्या विस्ताराचा निर्णय

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कापडाचें उत्पादन ५८० कोटी वार करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. हें उद्दिष्ट गाठण्यास साह्य व्हावें म्हणून भारत सरकारनें धंद्याचा अधिक विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या गिरण्यांत सध्या १२ हजार चात्या आहेत, त्यांना जास्तींत जास्त आणखी २५ हजार चात्या बसविण्याची परवानगी देण्यांत येईल. कापडाच्या धंद्याच्या विस्तारासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीची तरतूद करण्यासाठी एक कमिटी नेमण्याचें कॉटन टेक्सटाईल बोर्डानें ठरविलें आहे.

### बोकॅरो कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री

बोकॅरो येथें बांधण्यांत यावयाच्या पोलादाच्या चौथ्या कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री अमेरिकेकडून मिळणें शक्य होणार नाहीं हें निश्चित झाल्यावर कारखान्याच्या उभारणीचा फेरविचार करण्यासाठी भारत सरकारनें एक तांत्रिक कमिटी नेमली होती. कमिटीनें केलेल्या पाहणीवरून असें दिसून आलें आहे कीं कारखान्याला लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकी ५० ते ७५ टक्के यंत्रसामग्री देशांतच बनवितां येणें शक्य आहे. उरलेली जी यंत्रसामग्री परदेशांतून आयात करावी लागेल. ती पुरविण्यासाठी पुढील वर्षाच्या मध्याच्या सुमारास जगांतील कंपन्यांकडून टेंडर्स मागविण्यांत येतील. आयात करावयाच्या यंत्रसामग्रीची किंमत मागाहून देण्यासंबंधींच्या द्रव्यविषयक व्यवस्थेचाहि त्याच वेळीं विचार करण्यांत येईल. कारखान्याचा पहिला टप्पा १९६७-६८ पर्यंत उभारला जाईल असा अंदाज आहे.


" कुटुंब नियोजन कां व कसें "

( फक्त विवाहितांसाठी )


विनामूल्य पुस्तिकेसाठी आपलें नांव व पत्ता खालील पत्त्यावर कळविणें.

कुटुंब नियोजन अधिकारी,
महाराष्ट्र राज्य,
कॅनॉट हाउस, पुणें १






महाराष्ट्र राज्यांतील
लघु उद्योगांच्या विकासासाठीं
रु. १०,००० पर्यंतची दीर्घ मुदतीची
कर्जें सवलतीचे व्याजानें देण्यासाठी
राज्य सरकारनें महाराष्ट्र बँकेची
नेमणूक केली आहे.
उद्योगधंद्यांनीं या सवलतींचा
अगत्य फायदा घेवून
आपला विकास करावा.



उद्योग-व्यापार वृद्धिसाठीं महाराष्ट्र बँकेच्या विविध फायदेशीर योजनांचें माहितीपत्रक मागवा.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें २.

## अन्नधान्याच्या तुटवड्याची चिंता

रशिआंतील अन्नधान्याच्या तुटवड्यानें बरेंच उग्र स्वरूप धारण केल्याचें दिसत आहे. कारण, मि. ख्रुश्चोव्ह ह्यांनीं आपल्या अलीकडच्या एका भाषणांत, कोट्यवधि डॉलर्स खर्चून खतांचें उत्पादन वाढविण्यावर भर दिलेला आहे. शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी खतांचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर हातीं घेतल्यास रशिआला आपला लष्करावरील खर्च बराच कमी करावा लागेल. अंतर्गत अर्थव्यवस्थेंत होणाऱ्या ह्या संभाव्य उलथापालथीमुळें रशिआचें सरकार पाश्चिमात्य जगाशीं जुळवून घेण्याचे प्रयत्न अधिक तत्परतेनें करील अशीहि शक्यता आहे. सामुदायिक शेती रद्द करून सरकारी मालकीच्या अगर खाजगी मालकीच्या मोठ्या शेतांना उत्तेजन मिळणेंहि अशक्य नाहीं.

## केरळ राज्याचा तिसरा कार्यक्रम

केरळ राज्याचा तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम १७० कोटी रुपये खर्चाचा आहे. परंतु कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत ९० कोटी रुपयेच खर्च होतील असें दिसत आहे. १९६४–६५ सालांत करण्यांत यावयाच्या खर्चाला नियोजन समितीनें मान्यता दिली आहे. ह्या वर्षांत राज्य सरकार ४४·१७ कोटी रुपये खर्च करणार आहे. त्यापैकीं १८·५ कोटी रुपये विद्युत् उत्पादनावर खर्च करण्यांत येतील.

## पश्चिम जर्मनीचें शास्त्रीय अग्निबाण

पश्चिम जर्मनीच्या शास्त्रज्ञांनीं शास्त्रीय संशोधन करण्यासाठीं ४ अग्निबाण आकाशांत उडविण्यांत यश मिळविलें आहे. त्यासाठी वापरण्यांत आलेलें इंधन घन होतें. आकाशांत कित्येक मैल उंच उडण्याचें त्यांचें सामर्थ्य होतें. प्रत्यक्षांत मात्र ते ९० हजार फुटांपर्यंतच गेले. प्रत्येकांत १० पौंड वजनाचीं शास्त्रीय उपकरणें होतीं. त्यांची प्रत्येकी किंमत १,३५० रुपये होती. अग्निबाण तयार करणाऱ्या कंपनीच्या मतानें त्यांचा उपयोग लष्करासाठीहि करतां येईल. मात्र त्या दृष्टीनें त्यांच्या रचनेंत बदल करावा लागेल.

## प्राचीन अवशेषांचें जतन


इजिप्तमध्यें बांधण्यांत येत असलेल्या आस्वान येथील प्रचंड धरणामुळें इजिप्तच्या न्युबिआ ह्या भागांत बांधण्यांत आलेल्या प्राचीन देवळांना धोका उत्पन्न झाला आहे. धरणाचें काम पूर्ण झाल्यावर हीं देवळें पाण्याखालीं बुडून जाणार आहेत. हीं देवळें वांचविण्याचें काम संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या पुरस्कारानें चालू आहे. एकूण १७ देवळांपैकी ७ देवळांचे भग्नावशेष आतां सुरक्षित ठिकाणीं हलविण्यांत आले आहेत. आणखी तीन देवळें हलविण्याचें काम करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कंपन्यांशीं वाटाघाटी चालू आहेत. देवळें हलविण्याच्या बिकट कामासाठी अमेरिकेनें इजिप्तला १० लाख इजिप्शियन पौंडांचे कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. भग्नावशेषांचें जतन करण्याबाबत सल्ला देण्यासाठीं अमेरिका, रशिया, ब्रिटन, प. जर्मनी, फ्रान्स व अरब प्रजासत्ताक ह्यांची एक समिति स्थापन करण्यांत आलेली आहे.

## आपल्या पैशांपैकी निम्म्यावर अमेरिकेची मालकी

भारतांतील प्रचलित नाण्यांपैकी निम्म्यावर अमेरिकेची मालकी आहे, असें न्यूयॉर्क टाइम्सनें म्हटलें आहे. अमेरिका भारताला अन्नधान्यें पाठवीत आहे, त्याची किंमत येथेंच रुपयांत साठविली जात आहे. हे " कौंटरपार्ट फंडस् " फुगत चालले आहेत. त्यांचा विनियोग भारतांतच व्हावा लागतो. त्या फंड्सची किंमत आतां १५०० कोटी रुपयांवर गेली आहे.



सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमचीं वैशिष्ट्यें —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.
फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
ठाकूरद्वार, गिरगांव, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

## नद्यांच्या पुरांची वार्षिक आपत्ति

### नुकसानीची व्याप्ति : उपाययोजनेचें स्वरूप

नद्यांना पूर येऊन फार मोठें नुकसान होतें. दरवर्षी जून ते सप्टेंबर ह्या महिन्यांत अनेक नद्यांना महापूर येऊन मनुष्यहानि आणि मालमत्तेची हानि होते. पिकांचें नुकसान मोठ्या प्रमाणावर होतें. दरवर्षी सुमारें ३० कोटी रुपये किमतीचीं पिकें पुरामुळें नाश पावतात. मालमत्ता आणि माणसें ह्यांचेवरील आघाताची किंमत दरसाल १० कोटी रुपये तरी भरते. रेल्वेमार्ग, रस्ते, टेलिफोन्स, टेलिग्राफ्स, इत्यादींचें दरसाल ४ कोटी रुपये नुकसान होतें. ह्याखेरीज अप्रत्यक्ष होणारें नुकसान वेगळेंच.

चालू वर्षीच्या पावसाळ्यांत आसामला नेहमींप्रमाणें पुरांचा मोठा तडाखा बसला. बिहार, पंजाब, उत्तर प्रदेश, प. बंगाल आणि कांहीं अंशीं गुजरात, मध्य प्रदेश आणि म्हैसूर ह्यांनाहि नुकसान सोसावें लागलें. त्रिवेंद्रम, कोझिकोड, अलेप्पी, हे केरळांतील किनाऱ्यावरचे जिल्हेहि जमिनीच्या धूपास बळी पडले. उत्तर प्रदेशांतील ४·७ लक्ष एकर जमीनीचें नुकसान झालें असल्याचें समजतें. राजस्थानांत सर्वांत कमी पाऊस पडतो; पण तेथें पुराच्या पाण्याखाली बरीच जमीन गेली होती. पंजाबांतील पिकांच्या हानीचा अंदाज १ कोटि रुपये आहे.

ब्रह्मपुत्रा नदी अतिशय उच्छृंखल आहे; आपल्या कांठच्या हजारों मैलांचा प्रदेश ती वाहून टाकते. आसामला त्याचा फार मोठा तडाखा बसतो. टीस्टा, जलधका आणि महानद ह्या नद्यांमुळें पश्चिम बंगालला धोका पोचतो. कोसी नदी बिहारला घातक ठरते, तर गंगेच्या पसरणाऱ्या पाण्याखाली उत्तर प्रदेशाचा मुलूख सांपडतो. पंजाब, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, ह्यांवर पुराची आपत्ति कमी प्रमाणांत आली, तरी सिंधूच्या उपनद्यांची ( सतलज, रावी, बीस, चिनाब, झेलम, ) त्यांना भीति बाळगावी लागते. आंध्र आणि ओरिसा ह्यांच्या किनाऱ्यावरील मुलुखांतून पुरांचें पाणी पसरण्याचा संभव असतो.

१९५४ मधील महापुरामुळें ह्या प्रश्नाकडे विशेष लक्ष पुरविण्यास प्रारंभ झाला. तात्कालिक, मध्य मुदतीच्या आणि दीर्घ मुदतीच्या, अशा तीन प्रकारच्या उपाययोजना आखण्याचें ठरलें. सेंट्रल फ्लड कंट्रोल बोर्ड, सेंट्रल वॉटर अँड पॉवर कमिशनचा 'पूर' विभाग आणि रिव्हर कमिशन्स, अशा तीन संघटनांकडे पूरनियंत्रणाचें काम सोंपविलेलें आहे. कंट्रोल बोर्डाकडे मुख्यत: तत्त्वें घालून देऊन, धोरणें आखून, रिव्हर कमिशन्सनीं सादर केलेल्या योजना तपासून मंजूर करण्याचें काम आहे.

आतांपर्यंत सुमारें ३,८०० मैल लांबीचे बांध घालून ७० लक्ष एकर जमिनीला पुरापासून सुरक्षित करण्यांत आलें आहे. ५७ गांवांचेंहि असेंच रक्षण केलें आहे. १३ राज्यांतून फ्लड कंट्रोल बोर्डें स्थापन करण्यांत आलीं आहेत. आंतरराज्य स्वरूपाचीं चार नद्या कमिशनें काम करीत आहेत. पुराखाली सापडणाऱ्या मुलुखाचा अभ्यास चालू आहे. भाक्रा, हिराकुद, पानचेट हिल, इत्यादि विविधकार्यकारी धरणें बांधून सतलज नदी, महानदी आणि दामोदर नदी, ह्यांना नियंत्रित करण्यांत येत आहे.

## चीनच्या अडचणींची अधिकृत कबुली

चीनच्या अर्थव्यवस्थेंत माजलेल्या गोंधळाचें खापर चिनी पुढारी मुख्यत: नैसर्गिक आपत्तींवर फोडीत होते. परंतु आतां त्यांनीं ह्या कारणांबरोबरच व्यावहारिक चुका झाल्याचीहि कबुली दिली आहे. रशिआशीं दुरावलेल्या संबंधांचा उल्लेख करून पेकिंगमधील अधिकृत वृत्तपत्रानें रशिआच्या असहकाराची माहितीहि प्रसिद्ध केली आहे. ह्या माहितीप्रमाणें रशिआनें जुलै १९६० मध्यें आपले १३९० तज्ज्ञ एकाएकीं काढून घेतले, ३४३ करार रद्द केले आणि २५७ कामाबद्दल देण्यांत येणारे तांत्रिक व शास्त्रीय सहकार्य बंद केलें. त्यामुळें चीनचा मूळचा ठरलेला विकासाचा कार्यक्रम पार पाडण्यांत अतिशय अडचणी आल्या.

## मिटून घडी करतां येण्यासारखी झोपडी

रुरकी येथील बांधकामविषयक संशोधन करणाऱ्या संस्थेनें लाकडाची उघडझाप करता येण्यासारखी एक झोपडी प्रयोगादाखल बनविली आहे. ह्या झोपडींचे भाग अशा रीतीनें बनविण्यांत आले आहेत कीं, ती उभारणें अगर मोडणें सहज शक्य व्हावें. छोट्या कचेऱ्या, सामान ठेवण्याच्या खोल्या, तात्पुरतीं आश्रयस्थानें म्हणून त्यांचा उपयोग चांगला होण्यासारखा आहे. झोपड्यांचा सांगाडा ८० मैलांच्या वादळाला अगर हिमवर्षावाला तोंड देण्याइतका मजबूत आहे.

## लंडन बाजारांत रशिअन सोन्याची विक्री

लंडनच्या बाजारपेठेंत रशिआनें गेल्या कांहीं आठवड्यांत २५ टन वजनाचें व १४ कोटी रुपये किंमतीचे सोनें विकल्याच्या वार्ता आहेत. रशिआंतील दुष्काळी परिस्थितीमुळें तेथें गव्हाचा तुटवडा पडला असून अमेरिकेकडून व कॅनडाकडून गहूं आयात करण्याचे रशिआचे प्रयत्न चालू आहेत. गव्हाची किंमत चुकती करण्यासाठी रशिआ सोन्याची विक्री करीत आहे. युरोपमधील बाजारपेठेंत रशिआ आणखीहि कांहीं सोनें विक्रीस काढील असा अंदाज आहे. आतांपर्यंत म्हणजे गेल्या सप्टेंबरपर्यंत रशिआनें ह्या वर्षी ३०० कोटी रुपयांच्या किंमतीचें सोनें विकलें असावें. रशिआजवळ सोन्याचा किती साठा आहे हें एक गुपितच आहे. युरोपीय तज्ज्ञांच्या अंदाजाप्रमाणें रशियाजवळ २,००० ते ५,००० कोटी रुपये किंमतीचें सोनें असावें. पहिला आकडा जवळजवळ ब्रिटनच्या सुवर्णनिधीइतका आहे. दुसरा आकडा अमेरिकेच्या सुवर्णनिधीच्या दोन तृतीयांशइतका आहे.

## संगीतानें भारावलेलें बीं अधिक उत्पादक होत नाहीं.

संगीतामुळें उत्पादन वाढतें, हा समज चुकीचा ठरला आहे. दिल्ली येथील इंडियन ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट आणि कटक येथील सेंट्रल राइस रिसर्च इन्स्टिट्यूट ह्यांनीं प्रयोग करून पाहिलें, तेव्हां संगीतानें भारावलेल्या बियांपासून जास्त पीक अनुभवास येत नाहीं, असें आढळून आलें आहे. शेती मंत्र्यांनीं लोकसभेंत ही माहिती सांगितली.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## गवती तेलाच्या चहाची निर्यात

केरळ राज्याच्या अर्थव्यवस्थेत गवती चहाच्या तेलाच्या निर्यातीला महत्त्वाचं स्थान आहे. ह्या राज्यांतून दरसाल २·५ कोटी रुपये किमतीचें गवती चहाचें तेल निर्यात करण्यांत येतें. केरळ राज्यांत ७५ हजार एकर जमिनींत गवती चहाची लागवड करण्यांत येते व त्यामुळें पुष्कळ शेतमजुरांना रोजगारी मिळते. भारतांत ह्या तेलाची निर्मिति इतर कोणत्याहि देशापेक्षा अधिक होते. उत्पादनाचा बराच मोठा हिस्सा केरळ राज्यांत केंद्रित झालेला आहे. परंतु, अलीकडे दक्षिण अमेरिकेमधील ग्वाटेमाला हा देश गवती चहाच्या तेलाच्या बाजारपेठेंत उतरला आहे; इतकेंच नव्हे तर त्याची स्पर्धा भारताच्या व्यापाऱ्यांना जाणवूं लागली आहे. निर्यातीमुळें होणारी परदेशीय चलनाची प्राप्ति महत्त्वाची आहे.

## एंजिनिअरिंगच्या उद्योगधंद्यांचा संघ


भारत सरकारच्या विकासाच्या योजना पार पाडण्यास मदत व्हावी म्हणून एंजिनिअरिंगच्या धंद्यांनीं आपला एक संघ स्थापन करावा, अशी सूचना उद्योगपति श्री. बी. एम. बिर्ला ह्यांनीं केली आहे. प्रत्येक उद्योगधंद्यानें आपण बनवीत असलेल्या सुट्या भागांचा सरकारला पुरवठा केला तर परदेशीय चलनाची मोठी बचत केल्यासारखें होईल. शिवाय त्यामुळें औद्योगिक प्रगतीचा वेग वाढण्यासहि मदत होईल.

## पाणबुड्या देण्यास पाकिस्तानला नकार

गेल्या सप्टेंबर महिन्यांत पाकिस्ताननें जपानकडे पाणबुड्या मिळण्याबद्दल चौकशी केली होती. जपानमधील कारखान्यांतून पाकिस्तानला पाणबुड्या मिळूं शकणार नाहींत असें आतां कळविण्यांत आलें आहे. जपानच्या सध्यांच्या राज्यघटनेप्रमाणें परदेशांना शस्त्रास्त्रें पुरविण्यास बंदी आहे. पाकिस्तानच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी जपाननें ३ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलेलें आहे. ह्या कर्जाचा वापर करण्याबद्दल उभयता देशांत एक करार करण्यांत आलेला आहे. कराराच्या वेळीं ठरल्याप्रमाणें ह्या कर्जाच्या रकमेचा उपयोग लष्करी उपयोगाची सामग्री मिळविण्यासाठी पाकिस्तानला करतां येणार नाहीं. ह्या कारणाशिवाय पाकिस्तानला पाणबुड्या दिल्यास भारताबरोबरच्या स्नेहाच्या संबंधांवर विपरीत परिणाम होईल, अशी भीतीहि जपानच्या सरकारला वाटत आहे.

## सर्वांत मोठें शब्दकोडें

दक्षिण आफ्रिकेंतील 'दि स्टार' ह्या सायंदैनिकानें सर्वांत मोठें शब्दकोडें छापलें आहे. कोड्याचा विस्तार संपूर्ण पानभर आहे. शब्दकोड्यांत ४९०० चौकोन असून ते सोडविण्यासाठी लागणाऱ्या सूचक विधानांची संख्या ५७९ आहे. शब्दकोडें रचणाऱ्या तज्ज्ञाला त्यासाठी अधूनमधून मिळून ३ महिने लागले.



हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

## गवती तेलाच्या चहाची निर्यात

केरळ राज्याच्या अर्थव्यवस्थेंत गवती चहाच्या तेलाच्या निर्यातीला महत्त्वाच स्थान आहे. ह्या राज्यांतून दरसाल २·५ कोटी रुपये किमतीचें गवती चहाचें तेल निर्यात करण्यांत येतें. केरळ राज्यांत ७५ हजार एकर जमिनींत गवती चहाची लागवड करण्यांत येते व त्यामुळें पुष्कळ शेतमजुरांना रोजगारी मिळते. भारतांत ह्या तेलाची निर्मिति इतर कोणत्याहि देशापेक्षा अधिक होते. उत्पादनाचा बराच मोठा हिस्सा केरळ राज्यांत केंद्रित झालेला आहे. परंतु, अलीकडे दक्षिण अमेरिकेमधील ग्वाटेमाला हा देश गवती चहाच्या तेलाच्या बाजारपेठेंत उतरला आहे; इतकेंच नव्हे तर त्याची स्पर्धा भारताच्या व्यापाऱ्यांना जाणवूं लागली आहे. निर्यातीमुळें होणारी परदेशीय चलनाची प्राप्ति महत्त्वाची आहे.

---

## एंजिनिअरिंगच्या उद्योगधंद्यांचा संघ

भारत सरकारच्या विकासाच्या योजना पार पाडण्यास मदत व्हावी म्हणून एंजिनिअरिंगच्या धंद्यांनीं आपला एक संघ स्थापन करावा, अशी सूचना उद्योगपति श्री. बी. एम. बिर्ला ह्यांनीं केली आहे. प्रत्येक उद्योगधंद्यानें आपण बनवीत असलेल्या सुट्या भागांचा सरकारला पुरवठा केला तर परदेशीय चलनाची मोठी बचत केल्यासारखें होईल. शिवाय त्यामुळें औद्योगिक प्रगतीचा वेग वाढण्यासहि मदत होईल.


## पाणबुड्या देण्यास पाकिस्तानला नकार

गेल्या सप्टेंबर महिन्यांत पाकिस्ताननें जपानकडे पाणबुड्या मिळण्याबद्दल चौकशी केली होती. जपानमधील कारखान्यांतून पाकिस्तानला पाणबुड्या मिळूं शकणार नाहींत असें आतां कळविण्यांत आलें आहे. जपानच्या सध्यांच्या राज्यघटनेप्रमाणें परदेशांना शस्त्रास्त्रें पुरविण्यास बंदी आहे. पाकिस्तानच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी जपाननें ३ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलेलें आहे. ह्या कर्जाचा वापर करण्याबद्दल उभयता देशांत एक करार करण्यांत आलेला आहे. कराराच्या वेळीं ठरल्याप्रमाणें ह्या कर्जाच्या रकमेचा उपयोग लष्करी उपयोगाची सामग्री मिळविण्यासाठी पाकिस्तानला करतां येणार नाहीं. ह्या कारणाशिवाय पाकिस्तानला पाणबुड्या दिल्यास भारताबरोबरच्या स्नेहाच्या संबंधांवर विपरीत परिणाम होईल, अशी भीतीहि जपानच्या सरकारला वाटत आहे.

---

## सर्वांत मोठें शब्दकोडें

दक्षिण आफ्रिकेंतील 'दि स्टार' ह्या सायंदैनिकानें सर्वांत मोठें शब्दकोडें छापलें आहे. कोड्याचा विस्तार संपूर्ण पानभर आहे. शब्दकोड्यांत ४९०० चौकोन असून ते सोडविण्यासाठी लागणाऱ्या सूचक विधानांची संख्या ५७९ आहे. शब्दकोडें रचणाऱ्या तज्ज्ञाला त्यासाठी अधूनमधून मिळून ३ महिने लागले.




हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.